# शिक्षणाबरोबर श्रमाचे संस्कार होणे आजची गरज : मा.बजरंग पाटील




विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.बजरंग पाटील सोबत डॉ.के.एस. चौगुले, सौ.कल्पनाताई चौगुले, मा. अनिष पाटील, मा. जी.टी. पाटील, मा. शिवाजीराव पाटील, डॉ. अजय चौगुले, मा.निवास पाटील व इतर

कॉलेज जीवनामध्ये विद्यार्थ्यांच्यावर शिक्षणाबरोबर श्रमाचे संस्कार होणे आजची गरज आहे. त्याशिवाय विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकत नाही असे प्रतिपादन कोल्हापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मा.बजरंग पाटील यानी केले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी -कोतोली, ता. पन्हाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे क॥ ठाणे येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या उद्‌घाटन प्रसंगी मा. पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक -अध्यक्ष मा.डॉ.के.एस. चौगुले होते. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष मा. जी.टी.पाटील, सचिव मा. शिवाजीराव पाटील, संचालक डॉ. अजय चौगुले, जि.प. सदस्या सौ.कल्पनाताई चौगुले, लोकनियुक्त सरपंच मा. अनिष पाटील, उपसरपंच मा.विष्णू कुंभार सर्व ग्राम पंचायत सदस्य, मा.निवास पाटील, प्र. प्राचार्य डॉ.बी.एन.रावण सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विविध संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक,ग्रामस्थ, शिबीरार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख राष्ट्रीय सेवा योजना समिती प्रमुख डॉ.एम.के.कांबळे यानी केले स्वागत श्रीमती एस.जी. कांबळे यानी केले कार्यक्रमाचे आभार श्री.एम.वाय.पोवार यानी मानले तर सुत्रसंचलन श्री.डी.एच. नाईक यानी मानले.